वर्षा निवासस्थानी विविध देशांच्या महा वाणिज्यदूतांनी घेतले श्री गणेशाचे दर्शन >>पान 2

'एनटीए'मध्ये कायमस्वरूपी मजबूत व्यवस्था आवश्यक : सर्वोच्च न्यायालय >>पान 3

गणेशोत्सव मंडळातच मिळणार आरोग्यसेवेची माहिती >>पान 4


सुविचार

जेव्हा सगळे शक्य नाही म्हणतात, तेव्हा स्वतःवर विश्वास ठेवा



# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 58 ■ शनिवार, दि. 19 सप्टेंबर 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006


...अन् संतापलेल्या सलमान खानने गाडीतच ड्रायव्हरला मारले

आतील पान


# मराठा आरक्षणावर ९ ऑक्टोबरपासून नव्याने सुनावणी, हायकोर्टात नवे पूर्णपीठ स्थापन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** सरकारी नोकऱ्या व शिक्षणात मराठा समाजाला दहा टक्के आरक्षण देण्याला विरोध करणाऱ्या याचिकांवरील सुनावणीसाठी न्यायमूर्ती मकरंद कर्णिक, न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार व न्यायमूर्ती संदीप मारणे यांचे नवे पूर्णपीठ स्थापन करण्यात आले आहे. या नव्या पूर्णपीठापुढे येत्या ९ ऑक्टोबरपासून प्रकरणावर पुन्हा नव्याने सुनावणी सुरू होणार आहे.

कोलकाता उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीपदी नियुक्ती होण्यापूर्वी न्यायमूर्ती रवींद्र घुगे, न्यायमूर्ती जमादार आणि न्यायमूर्ती मारणे यांच्या खंडपीठापुढे या प्रकरणाची जवळपास गेल्या वर्षभरापासून नियमित सुनावणी सुरू होती. याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद पूर्ण झाल्यानंतर राज्य सरकारतर्फे



राज्याचे महाधिवक्ता मिलिंद साठ्ये यांचा युक्तिवाद सुरू होता. तथापि, न्यायमूर्ती घुगे यांची कोलकाता उच्च न्यायलयाच्या मुख्य न्यायमूर्तीपदी नियुक्ती झाल्याने नियमानुसार प्रकरणाची पूर्णपणे नव्याने सुनावणी सुरू होणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर प्रकरणाच्या नव्याने होणाऱ्या सुनावणीसाठी न्यायमूर्ती कर्णिक यांच्या अध्यक्षतेखालील नवे पूर्णपीठ स्थापन करण्यात आले.

या नव्या पूर्णपीठापुढे शुक्रवारी प्रकरणाची पहिली सुनावणी पार पडली. त्यावेळी आरक्षणाला विरोध करणारे याचिकाकर्ते संजीत शुक्ला यांच्यावतीने वरिष्ठ वकील प्रदीप संचेती यांनी या याचिकांवरील नव्याने सुनावणीची ही तिसरी वेळ असल्याचे न्यायालयाला सांगितले. यापूर्वी तत्कालीन मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय यांच्या अध्यक्षतेखालील पूर्णपीठापुढे प्रकरणाची सुनावणी झाली. परंतु, त्यांची दिल्ली उच्च न्यायालयात बदली झाल्यानंतर आणि मराठा नेते मनोज जरांगे यांनी गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये मुंबईत केलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर न्यायमूर्ती घुगे यांच्या अध्यक्षतेखालील पूर्णपीठ प्रकरणाच्या सुनावणीसाठी स्थापन करण्यात आले होते.

या पूर्णपीठापुढे गेल्या वर्षभरापासून नियमित सुनावणी सुरू होती. न्यायमूर्ती घुगे यांचीही कोलकाता उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीपदी नियुक्ती झाल्याने आता या पूर्णपीठापुढे प्रकरणाची नव्याने सुनावणी होत आहे, असे संचेती यांनी न्यायमूर्ती कर्णिक यांच्या अध्यक्षतेखालील पूर्णपीठाला सांगितले. त्यानंतर, त्यांनी प्रकरणाची दररोज आणि अतिरिक्त वेळ सुनावणी घेऊन प्रकरण निकाली काढण्याचीही विनंती केली.

मात्र, इतर प्रकरणे आणि कामाच्या ताणामुळे तूर्त अशा पद्धतीने प्रकरणाची सुनावणी घणे शक्य नसल्याचे न्यायमूर्ती कर्णिक यांनी स्पष्ट केले. तसेच, प्रकरणाची येत्या ९ ऑक्टोबरपासून सुनावणी सुरू करण्याचे नमूद करून सुरुवातीला याचिकाकर्त्यांतर्फे, मग राज्य सरकार आणि नंतर राज्य मागासवर्ग आयोग व अखेरीस आरक्षणाच्या समर्थनार्थ हस्तक्षेप याचिका करणाऱ्यांचे म्हणणे ऐकले जाईल, असे पूर्णपीठाने स्पष्ट केले.

## दहावी-बारावीच्या परीक्षांच्या तारखा जाहीर

**मुंबई** – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता दहावी आणि बारावीच्या २०२७ मधील वार्षिक परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक जाहीर केले आहे. यानुसार, बारावीची लेखी परीक्षा ८ फेब्रुवारीपासून, तर दहावीची परीक्षा १५ फेब्रुवारीपासून सुरु होणार आहे.

## उच्च न्यायालयच्या दणक्यानंतर उल्हासनगर महापालिका स्वीकृत नगरसेवक पदाची निवडणूक २४ सप्टेंबरला

**उल्हासनगर**– महापालिका स्वीकृत नगरसेवकांच्या ७ जागांची निवडणूक प्रक्रिया अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्याच्या पालिका आयुक्त मनिषा आव्हाळे आणि महापौर अश्रिवनी निकम यांच्या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयाने दणका देऊन निवडणूका २५ सप्टेंबर पूर्वी घेण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार महापौरांनी २४ सप्टेंबरला महासभा बोलावून त्यात स्वीकृत नगरसेवकांची निवड होणार आहे. तर २२ तारखेला स्वीकृत नगरसेवकांसाठी इच्छुक अर्ज दाखल करणार आहेत.

## नंदीग्राममध्ये काँग्रेसची ताकद वाढली, उमेदवाराच्या माघारीनंतर ममतांची मोठी घोषणा

**नंदीग्राम** – पश्चिम बंगालमधील नंदीग्राम विधानसभा मतदारसंघात होत असलेल्या पोटनिवडणुकीआधीच ममता बॅनर्जींना दोन मोठे झटके बसले आहेत. पक्ष नाव आणि निवडणूक चिन्हा हातून गेल्यामुळे ममतांना ऐनवेळी दुसरे चिन्ह मिळाले. पण, त्यानंतर उमेदवारांनेच अर्ज मागे घेतला. त्यामुळे ममता बॅनर्जींचा पक्षच निवडणुकीतून बाहेर गेला आहे. या राजकीय घडामोडीनंतर ममता बॅनर्जी यांनी काँग्रेसच्या उमेदवाराला पाठिंबा जाहीर केला आहे. त्यामुळे राजकीय वादात तृणमूल काँग्रेसचा मतदार काँग्रेसच्या उमेदवाराच्या पाठिमागे गेल्यास काँग्रेसची ताकद वाढणार आहे.

## यूपीआय शुल्क आकारणी विरोधात काँग्रेस व्यापारी आघाडीचे आंदोलन; निर्णय मागे घेण्याची मागणी

**नागपुर** – UPI व्यवहारांवर शुल्क आकारणीच्या निर्णयाला विरोध करत नागपुरातील चितारओळी परिसरात काँग्रेसच्या व्यापारी आघाडीने आंदोलन केलं. काँग्रेस व्यापारी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष अतुल कोटेचा यांच्या नेतृत्वात झालेल्या या आंदोलनात प्रवक्ते अतुल लोंढे यांच्यासह कार्यकर्ते सहभागी झाले होते. यावेळी केंद्र सरकारविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. तसेच अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. णझख वर शुल्क आकारणीचा निर्णय तातडीने मागे घ्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.

# तृणमूल काँग्रेसचं नाव बदललं! दोन्ही गटांना मिळालं नवं नाव अन् नवं चिन्ह

कोलकात्ता : पश्चिम बंगालमध्ये पुढील महिन्यात होणार्या विधानसभा पोटनिवडणुकीसाठी ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेस पक्षाला 'ममता ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस' हे नाव आणि 'फुटबॉल खेळाडू' हे चिन्ह देण्यात आले आहे. त्यांना पश्रि्चम बंगाल, मेघालय आणि त्रिपुरा या राज्यांमध्ये मान्यताप्राप्त राजकीय पक्ष म्हणून दर्जा देण्यात आला आहे. तर अरूप रॉय यांच्या नेतृत्वाखालील गटाला 'डेमोक्रॅटिक तृणमूल काँग्रेस' हे नाव आणि 'लिफाफा' हे चिन्ह देण्यात आले आहे.

पश्रि्चम बंगाल विधानसभा निवडणुकीत नामुष्कीजनक पराभवानंतर तृणमूल काँग्रेसमध्ये उभी फूट पडली. राज्यातील विधानसभा पोटनिवडणुकीसाठी पक्ष चिन्हावर दावा सांगण्यासाठी ममता बॅनर्जी गट आणि रूतब्रत बॅनर्जी गटाने निवडणूक आयोगाकडे धाव घेतली होती. अखेर गुरुवारी निवडणूक आयोगाने पक्षाचे नाव आणि चिन्ह गोठवले. त्यानंतर आज (दि. १८) ममता बॅनर्जी आणि रूतब्रत बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील गटांनी पर्यायी




नावे आणि चिन्हांसाठी आपली पसंती आयोगाकडे सादर केली होती.

आयोगाने दोन्ही बाजूंना शुक्रवारी सकाळी ११ वाजेपर्यंत नावे आणि चिन्हांसाठी प्रत्येकी तीन पर्याय सादर करण्यास सांगितले होते. बंगालमधील दोन विधानसभा जागांसाठी ६ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या पोटनिवडणुकीसाठी निवडणूक आयोग या तीन पर्यायांपैकी एकाची निवड करणार होते. ममता बॅनर्जी यांच्या गटाने पक्षाच्या नावासाठी ममता तृणमूल काँग्रेस, तृणमूल काँग्रेस ममता आणि तृणमूल ममता काँग्रेस असे तीन पर्याय सुचवले होते. तसेच, या गटाने निवडणूक चिन्हासाठी दोन पर्याय सादर केले होते. यामध्ये एका पर्यायात फुटबॉल खेळाडू तर दुसरा पर्याय क्रिकेट बॅट होता.

पश्रि्चम बंगाल विधानसभेतील विरोधी पक्षनेते रिताब्रत बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील अरूप रॉय यांच्या गटानेही पक्षाच्या नावासाठी नॅशनलिस्ट तृणमूल काँग्रेस, डेमोक्रॅटिक तृणमूल काँग्रेस आणि वेस्ट बंगाल तृणमूल काँग्रेस अशी नावे सुचवली होती. तर पक्ष चिन्ह म्हणून लिफाफा, टॉर्च आणि फळा हे तीन पर्याय सुचवले होते. दरम्यान, हा लढा सामूहिक नेतृत्व आणि एका व्यक्तीचे वर्चस्व यांच्यातील आहे, असे बंडखोर गटाचे नेते रिताब्रत बॅनर्जी यांनी म्हटले आहे.

गुरुवारी दिलेल्या अंतरिम आदेशात निवडणूक आयोगाने म्हटले आहे की, रेकॉर्डवरील सर्व माहितीचा सखोल विचार करण्यात आला. आयोगाचे असे मत आहे की 'ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस'मध्ये दोन प्रतिस्पर्धी गट आहेत; एक गट ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखाली आहे आणि दुसरा अरूप रॉय यांच्या नेतृत्वाखाली. दोन्ही गट आता आपणच मूळ पक्ष असल्याचा दावा करत आहेत. त्यामुळे, या वादावरील अंतिम निर्णय येईपर्यंत दोन्ही गटांना पक्षाचे नाव आणि 'फुले आणि गवत' हे चिन्ह वापरण्याची परवानगी दिली जाणार नाही. आता विधानसभा पोटनिवडणुकीत दोन्ही गट आपापल्या गटासाठी जी नावे निवडतील त्या नावांनी ओळखले जातील (त्यात त्यांची इच्छा असल्यास मूळ पक्ष 'ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस'शी संबंध दर्शवणाऱ्या नावांचाही समावेश असू शकतो). तसेच, सध्याच्या पोटनिवडणुकांसाठी निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या 'मुक्त चिन्हांच्या' यादीतून दोन्ही गट जी वेगळी चिन्हे निवडतील, ती त्यांना दिली जातील.

# मुंबई-गोवा महामार्गावर भीषण अपघात! केमिकल टँकर थेट ३०० फूट खोल दरीत कोसळला, तरीही चालक सुखरूप

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** मुंबई-गोवा महामार्गावर खेडजवळ एका धोकादायक वळणावर केमिकल टँकर थेट २५० ते ३०० फूट खोल दरीत कोसळून भीषण अपघात झाला आहे. अपघात इतका भीषण होता की, गाडीचा पार चक्काचूर झाला. मात्र आश्चर्यकारकरित्या चालक यातून बचावला आहे. अपघातानंतर स्थानिकांनी आणि इतर चालकांनी मदतीसाठी धाव घेतली.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन बचावकार्य राबवले आणि जखमी चालकाला उपचारासाठी नजीकच्या रुग्णालयात दाखल केले. या अपघातानंतर महामार्गावरील धोकादायक वळणांचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून,पोलीस अपघाताच्या कारणाचा अधिक तपास करत आहेत.

गडचिरोली-चामोर्शी मार्गावरील शिवणी नदी पुलावर आज राज्य परिवहन महामंडळाची एसटी बस उलटून झालेल्या भीषण अपघातात २० ते २५ प्रवासी जखमी झाले असून, यापैकी दोन ते तीन



प्रवाशांची प्रकृती गंभीर आहे. गडचिरोली येथून पोटेगावच्या दिशेने जात असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ही बस रस्त्याच्या लगत असलेल्या खोल भागात जाऊन कोसळली.

शिवणी नदी पुलाच्या दोन्ही बाजूंच्या पोच रस्त्याचे काम सध्या सुरू असल्याने या मार्गावरून प्रवास करताना वाहनचालकांना सतत कसरत करावी लागत आहे. अशातच पोटेगावला जाणाऱ्या या एसटी बसचा अपघात घडला. अपघातात अनेक प्रवाशांच्या हाता-पायाला तसेच चेहऱ्याला गंभीर व किरकोळ दुखापती झाल्या असून, घटनेनंतर सर्व जखमींना तातडीने उपचारासाठी गडचिरोलीच्या जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे

# एक महालक्ष्मी डॉक्टर, दुसरी वकील; यांच्या सजावटीतून स्त्री शिक्षणाचा जागर!

## महालक्ष्मी सजावटीतून 'मुलींना शिकू द्या, मोठं होऊ द्या'चा प्रेरणादायी संदेश; 'जागर स्त्रीशक्तीचा' देखावा ठरतोय आकर्षणाचा केंद्रबिंदू

दैनिक आपला विदर्भ

■ केशव सातपुते

**किनगाव जट्टू :** महालक्ष्मी पूजनाच्या पारंपरिक उत्सवाला सामाजिक जनजागृतीची अनोखी जोड देत सौ. कल्पना विनोद सातपुते यांनी यंदा 'जागर स्त्रीशक्तीचा' हा आगळावेगळा देखावा साकारला आहे. महालक्ष्मीच्या सजावटीतून स्त्री शिक्षण, महिला सक्षमीकरण आणि मुलींना स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा प्रेरणादायी संदेश देण्यात आला आहे. या सजावटीचे वैशिष्ट्य म्हणजे एक महालक्ष्मी डॉक्टर तर दुसरी महालक्ष्मी वकील अशा स्वरूपात साकारण्यात आली आहे. शिक्षणाच्या बळावर महिला आज विविध क्षेत्रांत सक्षमपणे कार्यरत आहेत, हा विचार या देखाव्यातून प्रभावीपणे मांडण्यात आला आहे. मुलींना शिकू द्या, मोठं होऊ द्या', 'स्त्री अबला नाही, सबला आहे', 'शिक्षण हेच सशक्तीकरणाचे प्रभावी माध्यम आहे' अशा घोषवाक्यांमधून समाजात स्त्री शिक्षणाबाबत सकारात्मक संदेश देण्यात आला आहे. पूर्वी महिलांचे विश्व केवळ घर आणि कुटुंबापुरते मर्यादित असल्याची पारंपरिक धारणा होती. मात्र, आज शिक्षणाच्या जोरावर मुली आणि महिला डॉक्टर, वकील, अधिकारी, उद्योजिका यांसह विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहेत. त्यामुळे मुलींना शिक्षणाची संधी देणे, त्यांच्या स्वप्नांना बळ देणे आणि त्यांना स्वावलंबी बनविणे ही काळाची गरज असल्याचा संदेश या सजावटीतून देण्यात आला आहे. धार्मिक श्रद्धा आणि सामाजिक बांधिलकी यांचा सुंदर संगम साधणाऱ्या या उपक्रमातून 'मुलगी शिकली तर कुटुंब, समाज आणि देशाची प्रगती होते' हा विचार अधोरेखित करण्यात आला आहे. कल्पना सातपुते यांच्या या अनोख्या आणि संदेशप्रधान महालक्ष्मी सजावटीचे परिसरातील महिला व नागरिकांकडून कौतुक होत असून, 'जागर स्त्रीशक्तीचा' हा देखावा सध्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे.





## अवकाशातही शस्त्रे सज्ज : मानवजातीसाठी धोक्याची घंटा!

अवकाश हे केवळ पृथ्वीभोवती पसरलेले अमर्याद आकाश नाही, तर मानवाच्या वैज्ञानिक प्रगतीचे आणि भविष्यातील संधींचे विशाल व्यासपीठ आहे. उपग्रहांच्या माध्यमातून दळणवळण, हवामानाचा अंदाज, शेती, आपत्ती व्यवस्थापन, दिशादर्शन, संशोधन अशा असंख्य क्षेत्रांना मोठी मदत मिळते. त्यामुळे अवकाशाचा वापर शांततापूर्ण आणि मानवकल्याणासाठी होणे अपेक्षित आहे. मात्र अवकाशातही शस्त्रस्पर्धा वाढत असल्याची बातमी चिंताजनक आहे. जगातील काही सामर्थ्यशाली राष्ट्रे पृथ्वीवरील सामरिक स्पर्धेबरोबरच अवकाशातही आपली संरक्षणक्षमता वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत. उपग्रहांचा नाश करू शकणारी किंवा त्यांना निष्क्रिय करणारी तंत्रज्ञानव्यवस्था विकसित झाल्यास त्याचा परिणाम केवळ दोन देशांपुरता मर्यादित राहणार नाही. आज जगातील बँकिंग, दळणवळण, हवामानविषयक माहिती, जीपीएस, इंटरनेट आणि अनेक अत्यावश्यक सेवा उपग्रहांवर अवलंबून आहेत. त्यामुळे अवकाशातील संघर्षाचा परिणाम सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनावरही होऊ शकतो. अवकाशात शस्त्रे तैनात करण्यामागे सुरक्षेचे कारण दिले जात असले तरी त्यातून निर्माण होणारी शस्त्रस्पर्धा अधिक धोकादायक ठरू शकते. एका देशाने क्षमता वाढवली की दुसरा देश त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी आणखी प्रगत तंत्रज्ञान विकसित करतो. अशा स्पर्धेला मर्यादा न राहिल्यास अवकाश शांततेचे क्षेत्र न राहता संघर्षाचे नवे मैदान बनण्याची शक्यता आहे.

यातील आणखी गंभीर बाब म्हणजे अवकाशातील पर्यावरणाची हानी. उपग्रहांवर हल्ले झाले किंवा त्यांचे तुकडे झाले तर मोठ्या प्रमाणात अवकाशीय कचरा निर्माण होऊ शकतो. हा कचरा वेगाने पृथ्वीभोवती फिरत राहतो आणि इतर उपग्रह तसेच अंतराळयानांसाठी धोका निर्माण करू शकतो. एका घटनेत निर्माण झालेला कचरा पुढे अनेक धोकादायक धडकांना कारणीभूत ठरू शकतो. त्यामुळे अवकाशातील प्रदूषण वाढण्याचा धोका दुर्लक्षित करता येणार नाही. मानवाने पृथ्वीवरील नैसर्गिक साधनसंपत्तीचा मोठ्या प्रमाणात वापर करून पर्यावरणाचे नुकसान केले आहे. आता हीच चूक अवकाशातही केली तर त्याचे परिणाम भविष्यातील पिढ्यांना भोगावे लागू शकतात. निसर्गाशी छेडछाड केल्याचे परिणाम पृथ्वीला भोगावे लागतात; त्याचप्रमाणे अवकाशाशी केलेली बेफिकीर छेडछाड मानवाच्या भविष्यासाठी संकट निर्माण करू शकते. अवकाशावर कोणत्याही एका देशाचा अधिकार नसून तो संपूर्ण मानवजातीच्या वैज्ञानिक प्रगतीशी संबंधित आहे. त्यामुळे अवकाशाचा वापर युद्धासाठी नव्हे, तर संशोधन, हवामान निरीक्षण, आपत्ती व्यवस्थापन, दळणवळण आणि मानवकल्याणासाठी व्हायला हवा. राष्ट्रांनी परस्पर विशास, पारदर्शकता आणि आंतरराष्ट्रीय नियमांच्या माध्यमातून अवकाशातील शस्त्रस्पर्धेला आळा घालण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. पृथ्वीवरील युद्धे थांबविण्याचे आव्हान अजूनही कायम असताना अवकाशात युद्धाची तयारी करणे ही मानवाच्या विवेकाची परीक्षा आहे. अवकाश जिंकण्याची नव्हे, तर जपण्याची गरज आहे. कारण अवकाशाचे रक्षण म्हणजे केवळ उपग्रहांचे रक्षण नव्हे; ते पृथ्वीच्या पर्यावरणाचे, विज्ञानाच्या प्रगतीचे आणि मानवजातीच्या भविष्यातील सुरक्षिततेचे रक्षण आहे.

# वर्षा निवासस्थानी विविध देशांच्या महा वाणिज्यदूतांनी घेतले श्री गणेशाचे दर्शन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत विविध देशांच्या महावाणिज्यदूतांनी श्री गणेशाचे दर्शन घेतले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सर्व महा वाणिज्यदूतांचे स्वागत करून त्यांच्यासमवेत श्री. गणेशाची पूजा केली.

यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी उपस्थित महा वाणिज्यदूतांशी संवाद साधला. गणेशोत्सवाच्या उत्साही आणि मंगलमय वातावरणात झालेल्या या भेटीत विविध विषयांवर सौहार्दपूर्ण चर्चा झाली. महावाणिज्यदूतांनीही श्री गणेशाचे दर्शन घेत महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा अनुभव घेतला.





महावाणिज्य दुतांमध्ये जपान येथील हितोमी सातो, व्हिएतनामचे ले क्वांग बिएन, दक्षिण कोरियाचे डोंगवान यू, युएइचे अब्दुल्ला हुसेन अलमर्झुकी, ओमान देशाचे महबूब अल रईसी, इटलीच्या वॉल्टर फेरारा, तुर्कीयेचे मुस्तफा केमालेत्तिन एरुयगुर, येमेन देशाचे मोहम्मद ताहेर अब्दुलमोघ्नी, कतारच्या अहमद साद अल-सुलैती, थायलंडचे सिरीपोर्न सुपानी मत्विसेटकुल, फ्रान्सचे पॅट्रिक लेव्हेरीनो, पोलंड देशाचे तोमाश व्हिएल्गोमास, जर्मनीच्या ख्रिस्टॉफ हॅलियर, युक्रेनचे मिस ना झायचेन्को, आयर्लंड देशाचे पैट्रिक डफी, ब्राझीलचे रेल्सा पेलुती अलेंकार, इजिप्त देशाचे डालिया तवाकोल, चीन देशाच्या चिन जी, नेदरलँडचे नाबिल ताउती, इराणचे सईद रझा मोसायेब मोत्लाघ, स्वीडनचे स्वेन ऑस्टबर्ग, नॉर्वे येथील मॉनिका नागेलगार्ड, श्रीलंकेच्या शिरानी अरियाराथ्ने, मलेशियाच्या नजवा मुस्यरीफाह रामली, इराकचे जुहैर साद अब्बास, बेल्जियमचे पियरे स्टीव्हर्लिंक यांचा समावेश होता.

बांग्लादेशाच्या उप उच्चायुक्त फरहाना अहमद चौधरी, ब्रिटनच्या उप उच्चायुक्त कमलजीत कांग यांच्यासह अमेरिकेच्या उप महावाणिज्यदूत एरिन युसेन यांची उपस्थिती होती. तसेच फिनलंड येथील उप महावाणिज्यदूत जोन्ना सुनि उपस्थित होते. याप्रसंगी मुख्य राज्य शिष्टाचार अधिकारी राजेश गवांदे, मुख्यमंत्र्यांचे गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव श्रीकर परदेशी, अमृता फडणवीस आदी उपस्थित होते.

## पुण्यात गणेशोत्सवात ‘एआय’ आणि ३,५०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा कडक पहारा

**पुणे । प्रतिनिधी :** शहरात मोठ्या उत्साहात गणेशोत्सव साजरा होतोय. पुणे शहरातील गणेशोत्सव हा जगप्रसिद्ध असून पुण्यातील गणेशोत्सव पाहण्यासाठी जगभरातून भाविक दर्शनासाठी येतात. गणेशोत्सवातील गर्दी पाहता गणेशोत्सव शांततेत, सुरक्षित आणि आनंदात पार पडावा यासाठी पुणे पोलीस सज्ज आहेत. शहरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी एआय तंत्रज्ञान आणि सुमारे ३,५०० सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आलेत. यावरून शहरातील गणेशोत्सवावर नजर ठेवण्यात येत आहे. गर्दीच्या मध्यवर्ती पेठ भागात अतिरिक्त २५० कॅमेरे तैनात करण्यात आले आहेत.

यावेळी पुण्यातील शिवाजीनगर पोलीस मुख्यालय येथील सहाय्यक पोलीस आयुक्त विवेक पवार म्हणाले की, पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या सूचनेनुसार गणेशोत्सव आनंदात साजरा व्हावा यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शहरातील गणेशोत्सवावर नजर ठेवण्यात येत आहे. पुणे पोलिसांच्या मध्यवर्ती नियंत्रण कक्षात सर्व कॅमेरे २४ तास प्रशिक्षित ऑपरेटर्समार्फत मॉनिटर केले जात आहेत. हे सर्व कॅमेरे ’एआय’ आणि नाईट व्हिजन क्षमतेने सुसज्ज असून याद्वारे फेस रेकग्निशन सिस्टीम, गर्दी नियंत्रण आणि मोजणी, शस्त्र शोधणे, धूर किंवा आग शोधणे, बेवारस वस्तू, संशयास्पद वाहने यावर कडक नजर ठेवली जात आहे असं यावेळी त्यांनी सांगितलं.

## नाशिकमध्ये धक्कादायक प्रकार सीसीटीव्हीत कैद, जाहिरातीला अडथळा ठरणाऱ्या झाडांची 10 हजारात सुपारी

**नाशिक । प्रतिनिधी :** जाहिरातीला अडथळा ठरत असलेल्या झाडांची कत्तल करणाऱ्या सहा संशयित आरोपींना पोलिसांनी अटक केलीय आहे. नाशिक शहरातील उच्चभ्रू मानला जाणारा गंगापूर रोड... रविवारी मध्यरात्री या रस्त्यावरील जेहान सर्कल ते बेडकुळे रस्त्यात असलेल्या दुभाजकातील साधारण ५५ झाडे अज्ञात चोरांनी कापून नेली होती. हा संपूर्ण प्रकार सीसीटीव्हीत कैद झाला होता. या सीसीटीव्हीच्या आधारे गंगापूर पोलिसांनी सहा जणांना अटक केली आहे. नाशिक महानगर पालिकेने शहरात सुभिकरणासाठी अनेक विदेशी प्रजातीचे झाडे लावली आहेत. याची संवर्धन आणि संगोपनाची जबाबदारी ही महानगर पालिकेची आहे. मात्र अज्ञात चोरांनी रविवारी रात्री जेहान सर्कल ते बेडकुळे दरम्यान असलेल्या दुभाजगातील ५५ झाडांची कत्तल केल्याची घटना घडली होती. याची साधारण किंमत २ लाख ७५ हजार रुपये इतकी असल्याच मानपकडून सांगण्यात आलं आहे. याप्रकरणी श्रीकांत किसन इरणक यांनी गंगापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. झाड कापण्याची संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली होती. या सीसीटीव्हीच्या आधारे गंगापूर पोलिसांनी तपास सुरू केला होता. सीसीटीव्ही त दिसणाऱ्या व्यक्तीचे विषण करून अखेर गुरुवारी सहा संशयित आरोपींना अटक केली आहे. प्राथमिक चौकशी केली असता या वृक्षतोडीमागे जाहिरात एजन्सीचे कारस्थान असल्याचे पोलीस तपासात पुढे आले आहे. सदर परिसरात स्ट्रीट लाईटवर जाहिरातींचे फलक लावायचे होते.


मात्र अडथळा ठरणाऱ्या झाडांमुळे हे फलक झाकले जात असल्याने संशयित खैरनार याला अवघ्या १० हजार रुपये देऊन या झाडांची कत्तल केली असल्याचं पोलिसांनी सांगितले आहे. गंगापूर पोलिसांनी अटक केलेल्या अभिमन खैरनार (३७), दिलीप बेंडकुळे (३ दीपक, दाते (२५), रोहिदास खुरखुटे (४५), अर्जुन चारोस्कर (३८) आणि मच्छिंद्र देशमुख (४४) या संशयितांना न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# कलाकारांच्या प्रोत्साहनासाठी मान्यवरांनी सांस्कृतिक कार्यक्रमांना उपस्थित राहावे –खासदार हेमा मालिनी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** देशभरात विविध उत्सवांच्या माध्यमातून कला, नाटक, नृत्य आणि संगीत सादर करण्याची संधी कलाकारांना मिळते. मात्र, या कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी देशातील नामांकित व्यक्तींनी सांस्कृतिक कार्यक्रमांना आवर्जून उपस्थित राहणे आवश्यक आहे. कलाकारांचा सन्मान आणि त्यांच्या कलेला मिळणारी दाद त्यांचा आत्मविश्वास वाढवते. पुणे फेस्टिव्हलमध्ये दरवर्षी विविध क्षेत्रांतील कलाकारांचा गौरव केला जातो, ही त्याची विशेष परंपरा आहे, असे मत मथुराच्या खासदार आणि अभिनेत्री हेमा मालिनी यांनी व्यक्त केले.

३८ व्या पुणे फेस्टिव्हलनिमित्त उद्घाटन सोहळ्यात आयोजित पुरस्कार सोहळ्यात त्या बोलत होत्या. पुणे फेस्टिव्हलचे संस्थापक अध्यक्ष व माजी खासदार दिवंगत सुरेश कलमाडी यांच्या स्मृतीस यंदाचा फेस्टिव्हल अर्पण करण्यात आला आहे. यंदापासून सुरू करण्यात आलेल्या ’संस्थापक सुरेश कलमाडी पुणे फेस्टिव्हल जीवनगौरव पुरस्कारा’ने ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांचा गौरव करण्यात आला. ज्येष्ठ चित्रपट निर्माते-दिग्दर्शक किरण शांताराम,



ज्येष्ठ नाट्यलेखक-दिग्दर्शक अतुल पेठे, भारतीय महिला हॉकी संघटनेच्या माजी अध्यक्षा अर्णवाज दमानिया आणि फ्लाइंग ऑफिसर निधी सुधीर अगरवाल यांनाही ’पुणे फेस्टिव्हल पुरस्कार’ देऊन सन्मानित करण्यात आले. निधी अगरवाल यांच्या वतीने त्यांच्या कुटुंबीयांनी पुरस्कार स्वीकारला.

सार्वजनिक गणेशोत्सवाची शताब्दी साजरी करणाऱ्या रणमर्द शिवाजी मंडळ आणि श्री हनुमान मंडळ प्रतिष्ठानचाही सन्मान करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, पुणे फेस्टिव्हलच्या अध्यक्षा मीरा कलमाडी आणि अध्यक्ष कृष्णकुमार गोयल उपस्थित होते. कृष्णकुमार गोयल यांच्या गौरवग्रंथाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

’तुमच्या प्रेमळ शहरात येऊन मला आनंद झाला,’ असे मराठीत सांगत हेमा मालिनी यांनी पुण्याशी असलेले आपले ऋणानुबंध अधोरेखित केले. त्या म्हणाल्या, ’’गेल्या ३० वर्षांपासून मी पुणे फेस्टिव्हलशी जोडलेली आहे. सुरेश कलमाडी यांनी मला या व्यासपीठावर कला सादर करण्याची संधी दिली. गणेशोत्सवाच्या निमित्ताने विविध कला सादर केल्या आणि पुणेकर रसिकांचे भरभरून प्रेम मिळाले. कलमाडी यांनी मला सातत्याने प्रोत्साहन दिले. देशातील अनेक दिग्गज कलाकार या फेस्टिव्हलमध्ये सहभागी झाले असून त्यामुळे या उत्सवाची दखल जगभर घेतली जात आहे.’’

मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, ’’गणेशोत्सव कसा साजरा करायचा, यावर आज दोन प्रवाह दिसतात. मोठा डीजे, डॉल्बी, प्लाझ्मा आणि लेझर लावून उत्सव साजरा करण्याची एक पद्धत आहे; तर कला-संस्कृतीचा उत्सव म्हणून पुणे फेस्टिव्हल साजरा करण्याची दुसरी परंपरा आहे. लोकमान्य टिळकांना अभिप्रेत असलेला सामाजिक आणि सांस्कृतिक आशयाचा गणेशोत्सव पुढे नेण्याच्या उद्देशाने सुरेश कलमाडी यांनी पुणे फेस्टिव्हलची निर्मिती केली. पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल म्हणाले, ’’कोणताही उत्सव आपोआप लोकोत्सव होत नाही. त्यामागे कार्यकर्त्यांची मोठी फळी आणि सातत्याने काम करणारे हात असतात. सुरेश कलमाडी यांनी या उत्सवाची धुरा यशस्वीपणे सांभाळली. पुणे फेस्टिव्हल पक्षविरहित राहिला असून पुणेकरांनी हा उत्सव डोक्यावर घेतला आहे. आज हा ब्रँड जगभर पोहोचला असून विविध देशांतील नागरिकही या उत्सवात सहभागी होत आहेत.’’

यंदा येरवडा कारागृहातील कैद्यांनी तयार केलेली गणेशमूर्ती पुणे फेस्टिव्हलमध्ये प्रतिष्ठापित करण्यात आली आहे. तसेच नेत्रदानाबाबत जनजागृतीही केली जात आहे. यावर्षीपासून सुरेश कलमाडी जीवनगौरव पुरस्कार सुरू करण्यात आला आहे. ’पुणे फेस्टिव्हल’ हा केवळ ३८ वर्षांचा आकडा नसून पुण्याची संस्कृती समृद्ध करण्याची सातत्यपूर्ण परंपरा आहे. कलाकार केवळ समाजाचे मनोरंजन करत नाही, तर आपल्या कलेच्या माध्यमातून समाजाचे प्रबोधन करून प्रत्येकाला स्वत:कडे पाहण्याची दृष्टी देतो, असे गोयल यांनी सांगितले.

यंदाच्या पुणे फेस्टिव्हलमध्ये ५० हून अधिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून हे कार्यक्रम विनामूल्य असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# एसटीच्या सवलती प्राप्त प्रवाशांसाठी एनसीएमसी कार्ड नोंदणी व वितरण प्रक्रियेत बदल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) एनसीएमसी कार्ड प्रकल्पांतर्गत अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक तसेच महिला सवलतधारक प्रवाशांसाठी कार्ड नोंदणी व वितरणाची प्रक्रिया सुरू आहे. प्रवाशांना सवलतीचा लाभ अधिक सुलभपणे मिळावा यासाठी महामंडळाने काही महत्त्वाचे बदल केले असून, संबंधित लाभार्थ्यांनी त्याची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

**बायोमेट्रिक जुळत नसल्यास आधार ओटीपीचा पर्याय**

ज्या अमृत ज्येष्ठ नागरिक लाभार्थ्यांच्या बायोमेट्रिकमध्ये बोटांचे ठसे जुळत नाहीत, अशा लाभार्थ्यांसाठी २१ सप्टेंबर २०२६ पासून आधारकार्ड संलग्न भ्रमणध्वनी क्रमांकावर प्राप्त ओटीपीच्या आधारे एनसीएमसी कार्डची नोंदणी करता येणार आहे. त्यामुळे बायोमेट्रिक प्रमाणीकरणात अडचण येणाऱ्या लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**हरवलेले किंवा चोरीला गेलेले कार्ड पुन्हा मिळणार**

२१ सप्टेंबरपासून हरवलेले अथवा चोरीला गेलेले एनसीएमसी कार्ड ब्लॉक करून रु. १९९ शुल्क भरून नव्याने नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे.

**नोंदणी केलेल्या लाभार्थ्यांना २५ सप्टेंबरपासून कार्ड वितरण**

१९ सप्टेंबरपर्यंत एनसीएमसी कार्डसाठी नोंदणी केलेल्या लाभार्थ्यांना २५ सप्टेंबर २०२६ पासून कार्ड वितरणासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**क्यूआर कोड पावतीद्वारे सवलतीचे तिकीट**

१६ सप्टेंबरपासून एनसीएमसी कार्डसाठी नोंदणी करणाऱ्या अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक तसेच महिला सवलतधारक प्रवाशांना क्युआर कोड असलेली पावती देण्यात येणार आहे. ही पावती एसटीच्या ईटीआयएम मशीनवर स्कॅन केल्यानंतर संबंधित सवलतधारकाला सवलतीचे तिकीट मिळणार आहे. ही नोंदणी पावती ३० दिवसांपर्यंत ग्राह्य राहणार आहे. दरम्यान, नोंदणी केलेल्या लाभार्थ्यांनी ३० दिवसांच्या आत एनसीएमसी कार्ड क्टीव्ह करून त्यामध्ये टॉप-अप करणे आवश्यक आहे. त्यामुळे सवलतीचा प्रवास अखंडितपणे सुरू ठेवण्यासाठी लाभार्थ्यांनी वेळेत ही प्रक्रिया पूर्ण करावी.

एसटी प्रवासातील सवलतीचा लाभ मिळविण्यासाठी सर्व संबंधित सवलतधारक लाभार्थ्यांनी तात्काळ एनसीएमसी कार्ड नोंदणी करून घेणे




आवश्यक आहे. एनसीएमसी कार्डच्या माध्यमातून सवलतीच्या प्रवासाची प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि डिजिटल करण्याच्या दृष्टीने एसटी महामंडळाकडून ही कार्यवाही करण्यात येत आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### जन्मदाखला, शाळेच्या दाखलाच्या अटीने निराधारांचा आधार हिरावला जाणार?; नियमांचा फेरविचार करण्याची मागणी

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव** – राज्यातील निराधार, विधवा, परित्यक्ता, वयोवृद्ध आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांसाठी संजय गांधी निराधार अनुदान योजना आधार ठरत आहे. मात्र, योजनेच्या लाभासाठी जन्मदाखला किंवा शाळेचा दाखला आवश्यक असल्याने ग्रामीण भागातील अनेक लाभार्थ्यांसमोर अडचणी निर्माण झाल्याची तक्रार आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिकांकडे जुने जन्मदाखले किंवा शाळेच्या नोंदी उपलब्ध नसल्याने वय सिद्ध करण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. अनेकांच्या जन्माची नोंदच झालेली नसल्याने जन्मदाखला मिळवणेही कठीण ठरत असल्याचे सांगण्यात येत आहे.

### आवक वाढल्याने भाजीपाल्याचे दर गडगडले; शेतकऱ्यांना आर्थिक फटका

दैनिक आपला विदर्भ

**शिरपूर** – शिरपूर येथील भाजी मार्केटमध्ये भाजीपाल्याची मोठ्या प्रमाणात आवक झाल्याने बाजारभावात मोठी घसरण झाली आहे. दर कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत असून, उत्पादनासाठी केलेला खर्चही भरून काढणे कठीण झाले आहे. शिरपूर भाजी मार्केटमध्ये सध्या टोमॅटोची सुमारे १५० कॅरेट आवक होत असून, टोमॅटोला १५० रुपये कॅरेट भाव मिळत आहे. मिरची १० रुपये किलो, वांगी ३०० रुपये कॅरेट, काकडी १० रुपये किलो, तर कोथिंबिरीला ३० रुपये किलो भाव मिळत आहे. वाहतूक, मजुरी, तोडणी आणि इतर खर्चाचा विचार करता सध्याच्या बाजारभावात उत्पादन खर्चही निघत नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

### माजलगाव धरणाच्या उंचीवाढीविरोधात शेतकऱ्यांचा एल्गार; २२ गावांतील शेतकऱ्यांचे जलसमाधी आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**माजलगाव** – माजलगाव धरणाच्या प्रस्तावित उंचीवाढीविरोधात २२ गावांतील शेतकरी आक्रमक झाले आहेत. धरणाची उंची वाढवण्याच्या निर्णयाला विरोध करत शेतकऱ्यांनी थेट धरणाच्या पाण्यात उतरून जलसमाधी आंदोलन केले. धरणाची उंची वाढवल्यास शेतजमिनींसह नागरिकांच्या भवितव्यावर परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे प्रस्तावित उंचीवाढ तातडीने थांबवावी, अशी प्रमुख मागणी आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांनी केली. या आंदोलनाला विविध राजकीय पक्षांचे नेते आणि पदाधिकाऱ्यांसह युवा शेतकरी संघर्ष समितीनेही पाठिंबा दिला. २२ गावांतील शेतकरी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते.

### प्रेमसंबंधाच्या संशयावरून पत्नीची हत्या; पनवेल पोलिसांकडून पतीसह साथीदाराला अटक

दैनिक आपला विदर्भ

**पनवेल** – पनवेल शहर पोलिसांनी गव्हाण फाटा ब्रिजजवळ आढळलेल्या अज्ञात महिलेच्या मृतदेहाचे गूढ उकलले असून, या प्रकरणात महिलेचा पती सुशील हिरेन आणि त्याचा साथीदार रमेश एक्का यांना अटक केली आहे. १६ तारखेला सकाळी गव्हाण फाटा ब्रिजखाली, रेल्वे पुलाजवळ एका महिलेचा मृतदेह आढळून आल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली होती. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि डीबी पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. तपासादरम्यान मृत महिलेची ओळख विविआना सुशील हिरेन अशी पटली. पोलिसांच्या तपासात धक्कादायक माहिती समोर आली.

विविआना हिरेन यांची हत्या त्यांचे पती सुशील हिरेन यांनी त्यांचा मित्र रमेश एक्का याच्या मदतीने केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

### सहपालकमंत्री माधुरी मिसाळ यांचा दौरा

**कोल्हापूर । प्रतिनिधी** : नगर विकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक विकास व औकाफ राज्यमंत्री तथा जिल्ह्याच्या सहपालकमंत्री माधुरी मिसाळ या जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

रविवार, दिनांक २० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता शासकीय विश्रामगृह, कोल्हापूर येथे आगमन व राखीव. सकाळी ११ वाजता शासकीय विश्रामगृह, कोल्हापूर येथून कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर सहकारी साखर कारखाना, हुपरी ता. हातकणंगले कडे प्रयाण. सकाळी ११.२५ वाजता कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर सहकारी साखर कारखाना हुपरी ता. हातकणंगले येथे आगमन. सकाळी ११.३० ते १ पर्यंत महालक्ष्मी ग्रिन एनर्जी कॉम्प्लेक्सचे भूमिपूजन व (मा. केंद्रीय गृह व सहकारमंत्री) यांच्या समवेत शेतकरी म ेळाव्याला उपस्थिती. दुपारी १ ते १.३० वाजता राखीव (स्थळ- कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर सहकारी साखर कारखाना हुपरी ता. हातकणंगले) दुपारी १.४० वाजता कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर सहकारी साखर कारखाना हुपरी ता. हातकणंगले येथून नृसिंहवाडी कडे प्रयाण. दुपारी २.१० वाजता नृसिंहवाडी येथे आगमन व राखीव. दुपारी ३.३० वाजता नृसिंहवाडी येथून पुणे कडे प्रयाण.

# 'एनटीए'मध्ये कायमस्वरूपी मजबूत व्यवस्था आवश्यक : सर्वोच्च न्यायालय

## न्यायमूर्ती देणार एनटीए कार्यालयाला प्रत्यक्ष भेट

दैनिक आपला विदर्भ



**नवी दिल्ली** : नीट आणि राष्ट्रीय परीक्षा एजन्सी (एनटीए)च्या व्यवस्थेला स्थायी स्वरूप देणे हा सुधारणा प्रक्रियेचा सर्वात महत्त्वाचा भाग आहे. त्यासाठी एनटीएमध्ये मजबूत स्थायी व्यवस्था, स्थायी कर्मचारी आणि स्थायी कार्यक्षेत्र असले पाहिजे. अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीवरील अवलंबित्व कमी झाले पाहिजे. तरच एक स्थायी संस्थागत पाया तयार होऊ शकेल, असे सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने शुक्रवारच्या सुनावणीवेळी म्हटले आहे.

खंडपीठाने केंद्राच्या कार्मिक आणि प्रशिक्षण विभागाच्या सहसचिवांना आतापर्यंत उचललेली पावले आणि सुधारणा प्रक्रियेच्या प्रगतीची माहिती देणारे प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले.

सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा म्हणाले, मी आणि न्यायमूर्ती आलोक आराधे एनटीएच्या नवीन स्थायी कार्यालयाला भेट देऊ इच्छितो. खंडपीठाला एनटीएची कार्यप्रणाली, उपलब्ध सुविधा आणि कर्मचाऱ्यांची स्थिती प्रत्यक्ष पाहायची आहे. दरम्यान, नीट-यूजी परीक्षेच्या व्यवस्थेत संरचनात्मक सुधारणा करण्यासाठी नंदन नीलेकणी यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय कार्यदल सप्टेंबरच्या अखेरपर्यंत आपला पहिला अंतरिम अहवाल सादर करू शकते, अशी माहिती केंद्र सरकारने न्यायालयाला दिली.

सरकारतर्फे उपस्थित सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की, कार्यदलाने मोठ्या प्रमाणावर विचारविनिमय केला आहे. माजी इस्रो प्रमुख के. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ समितीच्या सदस्यांकडूनही सूचना मागवल्या आहेत. सॉलिसिटर जनरल यांनी न्यायालयाला सांगितले की, शिक्षण विभागाने एनटीएसाठी नवीन आणि उन्नत संरचना तयार केली असून संस्थात्मक पातळीवर स्थायित्व सुनिश्चित करण्याचे प्रयत्न केले आहेत. मानवी संसाधनांच्या बाबतीत अद्याप पूर्णपणे स्थायी व्यवस्था होऊ शकलेली नाही. एनटीएच्या गोपनीय कामकाजाशी संबंधित कार्यालये मिंटो रोड येथील ५५,५२० चौरस फुटांच्या सरकारी परिसरात स्थलांतरित करण्यात आली आहेत. परिसराच्या सुरक्षेसाठी सीआयएसएफचे ३९ जवान तैनात आहेत आणि एक्स रे स्क्रीनिंगसारख्या सुरक्षा व्यवस्थाही केल्या आहेत.

प्रतिज्ञापत्र वेबसाईटवर अपलोड करा

सर्वोच्च न्यायालयाने एनटीएला स्वतः दाखल केलेले प्रतिज्ञापत्र वेबसाईटवर अपलोड करण्याचे निर्देश दिले, जेणेकरून इतर संबंधित पक्षदेखील सुधारणांची प्रगती पाहू शकतील. न्यायालयाने सुधारणा प्रक्रियेत विविध पक्षांकडून सूचना घेण्यासाठी एक वेगळा ई-मेल आयडी तयार करण्यासही सांगितले आहे.

## सरकारने युपीआय पेमेंटवर टॅक्स लागू केल्यानंतर महाराष्ट्रातील व्यापाऱ्यांनी घेतला मोठा निर्णय; ग्राहकांची होणार मोठी अडचण

दैनिक आपला विदर्भ

**अंबरनाथ । प्रतिनिधी** : केंद्र सरकारने १६ सप्टेंबर रोजी यूपीआय व्यवहारांवर अतिरिक्त शुल्क अर्थात एम डीआर आकारण्याची घोषणा केल्याने व्यापारी वर्गातून नाराजीचा सूर उमटत आहे. महाराष्ट्रातील व्यापाऱ्यांनी मोठा निर्णय घेतला आहे. या संभाव्य आर्थिक भाराला विरोध दर्शवण्यासाठी अंबरनाथ आणि उल्हासनगर शहरातील अनेक व्यापाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतल्याचे दिसत आहे.

१७ सप्टेंबर पासून अंबरनाथ आणि उल्हासनगर शहरातील व्यापाऱ्यांनी आपल्या दुकानांवरील यूपीआय पेमेंटचे फलक आणि क्यूआर कोड हटवण्यास सुरुवात केली आहे. केंद्र सरकारने लवकरात लवकर हा निर्णय मागे घ्यावा अन्यथा यासंदर्भात आंदोलन केला जाईल अशी घोषणा उल्हासनगर व्यापारी असोसिएशन चे अध्यक्ष दीपक छतलानी यांनी केली आहे.

ग्राहकांची होणार अडचण

व्यापाऱ्यांनी यूपीआय पेमेंटचे फलक आणि क्यूआर कोड हटवल्याने ग्राहकांना खरेदीसाठी खिशात रोख रक्कम बाळगणे अनिवार्य ठरू लागले आहे. उल्हासनगर हे ठाणे जिल्ह्यातील एक मोठे व्यापारी शहर म्हणून ओळखले जाते. घाऊक, किरकोळ खरेदी-विक्रीसह येथे अनेक लहान मोठ्या उद्योगांमधून उत्पादन सुरू असते. कापड, लाकूड अर्थात फर्निचर, जुनी वाहने, विद्युत उपकरणे, कपडे, मोबाइल अशी हजारो दुकाने, कारखाने शहरात आहेत. येथे दररोज कोट्यवधींची उलाढाल होत असते.

व्यापारी संतापले

आम्ही आधीच वस्तूंच्या खरेदी-विक्रीवर शासनाला वस्तू व सेवा कराच्या (जीएसटी) माध्यमातून कर अदा करत आहोत. त्यात यूपीआय सारख्या सुलभ आणि जलद प्रणालीवर अतिरिक्त शुल्क आकारल्यास त्याचा थेट आर्थिक फटका व्यापाऱ्यांना बसेल, अशी भीती व्यापाऱ्यांनी व्यक्त केली. संभाव्य आर्थिक भाराच्या पार्श्वभूमीवर उल्हासनगर शॉपकीपर असोसिएशनने केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडे यूपीआय व्यवहारांवरील शुल्काचा निर्णय त्वरित मागे घेण्याची मागणी केली आहे.

व्यापारी आणि ग्राहक या दोघांच्याही आर्थिक हिताचा विचार करून सरकारने या निर्णयाचा तातडीने पुनर्विचार करावा आणि सणासुदीच्या काळात बाजारपेठेतील व्यवहार सुरळीत होण्यासाठी व्यापारी वर्गाला दिलासा द्यावा, अशी आग्रही मागणी असोसिएशनचे अध्यक्ष दीपक छतलानी यांनी केली आहे.

व्यापाऱ्यांचे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना पत्र

आजच्या काळात २००० रुपये ही मोठी रक्कम नसून, या अतिरिक्त शुल्कामुळे अल्प नफ्यावर व्यवसाय करणारे व्यापारी आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रावर आर्थिक बोजा पडेल. या निर्णयामुळे व्यापारी पुन्हा रोख व्यवहारांकडे वळण्याची भीती आहे. डिजिटल इंडियाला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने झिरो-एमडीआर धोरण सुरू ठेवावे आणि यूपीआयचा भुर्दंड व्यापाऱ्यांच्या माथी मारू नये, अशी मागणी चेंबर ऑफ असोसिएशन्स ऑफ महाराष्ट्र इंडस्ट्री अँड ट्रेड या संघटनेने केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

## १२३ वर्षांची परंपरा जपणाऱ्या गणेश मंडळात 'लोकसंवाद'चा संदेश

दैनिक आपला विदर्भ

**हिंगोली । प्रतिनिधी** : हिंगोली शहरातील गणपती चौक येथे १२३ वर्षांची परंपरा असलेल्या मानाच्या श्री सार्वजनिक गणेश मंडळाच्या ठिकाणी 'लोकसंवाद-२०२६' उपक्रमाची जनजागृती करण्यात येत आहे. मंडळाच्या दर्शनी भागात 'लोकसंवाद-२०२६'बाबत माहिती देणारे बॅनर लावण्यात आले आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने मोठ्या संख्येने नागरिक या ठिकाणी येत असल्याने शासनाच्या लोककल्याणकारी योजना आणि उपक्रमांची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे.




गणपती चौकातील या मानाच्या गणेश मंडळाला नुकतीच पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांनी भेट देऊन गणरायाची आरती केली. त्यामुळे हे मंडळ गणेशभक्तांसह नागरिकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरले आहे. १२३ वर्षांची परंपरा असलेल्या या मंडळाच्या माध्यमातून यंदा धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांसोबत सामाजिक उपक्रमांनाही प्राधान्य देण्यात येत आहे.

जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने मंडळाचे अध्यक्ष विलास गोरे तसेच रजनीश पुरोहित, निखिल बांगर, संजय पवार, सुनील पाठक आणि विजय गुंडेकर यांना 'लोकसंवाद-२०२६' उपक्रमाची माहिती देण्यात आली. त्यानंतर मंडळाच्या ठिकाणी नागरिकांना सहज दिसेल अशा दर्शनी भागात लोकसंवादचे बॅनर लावण्यात आले आहे. गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांची मोठी गर्दी या ठिकाणी होत असते.

मोठ्या प्रमाणात महाआरोग्य शिबिर

श्री सार्वजनिक गणेश मंडळाच्या वतीने याच ठिकाणी मोठ्या प्रमाणात महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. शिबिरात मोठ्या संख्येने नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात येणार असून, तज्ज्ञ डॉक्टरांकडून आवश्यक वैद्यकीय मार्गदर्शन केले जाणार आहे.

## शर्तभंग प्रकरणात कठोर कारवाई करा; अपर मुख्य सचिव विकास खारगे यांचे आदेश

**ठाणे । प्रतिनिधी** : महसूल विभागाशी संबंधित कामकाजात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करावा. शासकीय जमिनीच्या शर्तभंगाच्या प्रकरणांत नियमानुसार कठोर कारवाई करून शासनाच्या जमिनीचे संरक्षण करावे, तसेच जमीन मोजणीची कामे अर्ज प्राप्त झाल्यानंतर शक्यतो १५ दिवसांत पूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी, असे निर्देश महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी दिले.

कोकण विभागातील महसूल यंत्रणेच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी कोकण भवन येथे आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, अतिरिक्त विभागीय आयुक्त सिद्धाराम सालीमठ, ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार, अपर आयुक्त वैशाली इंदाणी उंटवाल व उपायुक्त रवींद्र पवार यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. मुंबई शहर, पालघर आणि रायगडचे जिल्हाधिकारी तसेच अन्य अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले.

शासकीय जमिनीच्या शर्तभंगाच्या प्रकरणांचा गांभीर्याने निकाल लावून नियमानुसार जमीन शासन जमा करण्याची कार्यवाही करावी. अशा प्रकरणांमध्ये प्रभावी वसुली करून शासनाच्या मालमत्तेचे संरक्षण करण्याला प्राधान्य द्यावे, असे खारगे यांनी सांगितले.

## ...अन् संतापलेल्या सलमान खानने गाडीतच ड्रायव्हरला मारले

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी** : बॉलिवूड अभिनेता सलमान खानने गुरुवारी भाजपा नेते आणि मंत्री आशिष शेलार यांच्या घरी जाऊन गणरायाचे दर्शन आणि आशीर्वाद घेतले. मात्र, दर्शन घेऊन बाहेर पडताच त्याला चाहत्यांच्या आणि पापाराझींच्या गर्दीने वेढले. गर्दी इतकी जास्त होती की, सलमान खानची गाडी जागची हलू शकेल इतकी जागाही नव्हती. याच दरम्यान एक छोटीशी दुर्घटना घडली, ज्यामुळे सलमान खान आपल्या ड्रायव्हरवर संतापला.

सोशल मीडियावर एक व्हिडिओ समोर आला आहे ज्यात सलमानची गाडी गर्दीत अडकलेली दिसत आहे. या वेळी एक चाहता जखमी झाला. हे पाहताच सलमान खानने आपल्या ड्रायव्हरला फटकारले. गाडीभोवती चाहत्यांची प्रचंड गर्दी जमली होती आणि प्रत्येकजण सलमानची एक झलक पाहण्यासाठी उत्सुक होता. गर्दी इतकी दाट होती की गाडीला पुढे जाणे कठीण जात होते आणि सलमानच्या सुरक्षा पथकाला परिस्थिती हाताळताना अडचणी येत होत्या. या गोंधळात, चालकाने गाडी पुढे नेली असता एका चाहत्याचा पाय गाडीखाली आला. पापाराझींनी चालकाला गाडी मागे घेण्यास सांगितले. यावेळी चाहता वेदनेने रडताना दिसला.

हे सर्व पाहून सलमान खानचा पारा चढला. तो चालकावर संतापला आणि फटकारले. सलमानने रागाच्या भरात त्याच्या हातावर फटकादेखील मारला. त्याने चालकाला गाडी तिथून दूर नेण्यास सांगितले. हा व्हिडिओ समोर येताच लोकांनी सलमानचा राग योग्य असल्याचं सांगत त्याचे कौतुक केले. काहींनी सलमान हा एक नम्र स्टार असल्याचे म्हटले, तर काहींनी त्याला ट्रोलही केले.

यापूर्वी, जेव्हा सलमान एका मंत्र्यांच्या निवासस्थानी पोहोचला होता, तेव्हा तिथे प्रचंड गर्दी जमली होती. त्यावेळी त्याने हात जोडून चाहत्यांना वाट करून देण्याची विनंती केली होती. गर्दीतील एका मुलाला त्याला भेटायचे होते; सलमानने आपल्या अंगरक्षकाला त्या मुलाला ढकलण्यापासून रोखले आणि त्या लहान चाहत्याला भेटून व हस्तांदोलन करून त्याची इच्छा पूर्ण केली.

दरम्यान सलमान खानचा अपूर्व लाखिया दिग्दर्शित 'मातृभूमी' चित्रपट अद्याप रिलीज झालेला नाही. सध्या हा अभिनेता 'बिग बॉस २०' चे सूत्रसंचालन करताना दिसत आहे.

# सीमा तपासणी नाक्यावर गुटख्याची तस्करी उधळली

## ट्रकचालकास अटक; २६ लाख ३२ हजारांचा मुद्देमाल जप्त

दैनिक आपला विदर्भ

**धुळे । प्रतिनिधी** : मध्य प्रदेश आणि महाराष्ट्राच्या सीमेवरील हाडाखेड तपासणी नाक्याजवळ मुंबई-आग्रा महामार्गावरून प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूची तस्करी करण्याचा प्रयत्न शिरपूर तालुका पोलिसांनी हाणून पाडला. या कारवाईत ट्रकचालकास अटक करण्यात आली असून, गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू, सुपारी आणि ट्रक असा एकूण २६ लाख ३२ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

मध्य प्रदेशातून महाराष्ट्रात प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूची मोठ्या प्रमाणावर तस्करी होणार असल्याची माहिती शिरपूर तालुका पोलिस ठाण्याचे निरीक्षक जयपाल हिरे यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांनी पोलीस उपनिरीक्षक हेमंत खैरनार तसेच पोलीस अंमलदार संतोष पाटील, संदीप ठाकरे, राजू ढिसले, योगेश मोरे, स्वप्निल बांगर, विजय ढिवरे, सुनील पवार, दिनकर पवार आणि धनराज गोपाळ यांच्या पथकाला कारवाईच्या सूचना दिल्या.

पोलिसांनी हाडाखेड सीमा तपासणी नाक्याजवळ सापळा रचला. यावेळी मुंबई-आग्रा महामार्गावरून जाणारा अशोक लेलँड ट्रक अडवून तपासणी करण्यात आली. ट्रकमध्ये महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेला गुटखा, पानमसाला, तंबाखू आणि सुपारी आढळून आली. पोलिसांनी




ट्रकचालक नाजीर मजिद (रा. ४९, भडास, मेवात) याला ताब्यात घेत अटक केली.

कारवाईत ५ लाख १८ हजार ४०० रुपये किमतीचा आरएमडी पानमसाला (५७६ बॉक्स), १ लाख ४४ हजार रुपयांचा राफेल पानमसाला (१२०० पॅकेट), ५४ हजार रुपयांची विना लेबल सुगंधित तंबाखू (१२०० पॅकेट), २ लाख ४९ हजार रुपयांचा व्ही-७७ पानमसाला (२०८० पॅकेट), ६२ हजार ४०० रुपयांची व्ही-७००१ तंबाखू (२०८० पॅकेट), ३२ हजार ४०० रुपयांची राजू इलायची सुपारी (१०८० पॅकेट) आणि ७२ हजार रुपयांची राजू इलायची सुपारी गोल्ड (१४४० पॅकेट) जप्त करण्यात आली.

याशिवाय सुमारे १५ लाख रुपये किमतीचा अशोक लेलँड ट्रक जप्त करण्यात आला. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत २६ लाख ३२ हजार ६०० रुपये आहे. याप्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी आनंद भाऊराव पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिरपूर तालुका पोलिस ठाण्यात आरोपी नाजीर मजिद याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## महत्त्वाचे...

### जाहिरात फलक स्पष्ट दिसावेत म्हणून ५० हून अधिक झाडांची कत्तल; सहा जण ताब्यात

दैनिक आपला विदर्भ

**गंगापूर–** महानगरपालिकेने दुभाजकावर सावली आणि सुशोभीकरणासाठी लावलेली ५० हून अधिक झाडे तोडल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी तक्रार प्राप्त झाल्यानंतर गंगापूर पोलीस ठाण्यात काल गुन्हा दाखल करण्यात आला. प्रकरणाच्या तपासात जाहिरात फलक स्पष्ट दिसावेत, यासाठी झाडे तोडण्यात आल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी जाहिरात कंपनीच्या मालकासह सहा जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या झाडतोडीमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा पोलीस अधिक तपास करत आहेत.

### खामगाव नगर परिषदेच्या आरोग्य विभागाकडून भव्य 'स्वच्छता जनजागृती रॅली'चे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**खामगाव–**'स्वच्छता सेवा संकल्प' अभियानांतर्गत खामगाव नगर परिषद आरोग्य विभागाच्या वतीने शहरामध्ये भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. आगामी सण–उत्सवांच्या पार्श्र्वभूमीवर खामगाव शहराला स्वच्छ आणि सुंदर बनवण्याच्या उद्देशाने ही रॅली काढण्यात आली. सप्टेंबर ते डिसेंबर हा कालावधी गणेशोत्सव, नवरात्रोत्सव अन् दिवाळीसारख्या मोठ्या सण–उत्सवांचा असतो. या काळात प्रत्येक नागरिक, व्यावसायिक आणि व्यावसायिक प्रतिष्ठाने स्वच्छतेला प्राधान्य देतात. याच उत्साहाचा उपयोग करून शहराची स्वच्छता अधिक बळकट व्हावी, या हेतूने आरोग्य विभागाने ही पुढाकार घेतला.

### गणेश विसर्जनासाठी तगडा पोलीस बंदोबस्त ; ८०० पोलिसांचा फौजफाटा तैनात

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव** –चोपडा शहरातील सार्वजनिक, घरगुती आणि खासगी गणेश मंडळांचे पाचव्या दिवशी मोठ्या उत्साहात विसर्जन होत आहे. यंदा शहरातील ११५ गणेश मंडळांपैकी ६८ सार्वजनिक गणेश मंडळांच्या विसर्जन मिरवणुका निघणार आहेत. चोपडा शहरातील गणेश विसर्जन शांततेत आणि सुरळीत पार पडावे, यासाठी पोलीस प्रशासनाकडून तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. जिल्हाभरातील पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक, केंद्रीय राखीव पोलीस दल, द्रुत प्रतिसाद पथक, होमगार्ड तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांसह सुमारे ८०० जणांचा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.

### पंतप्रधान मोदींच्या वाढदिवसानिमित्त डोंबिवलीत महाआरती

दैनिक आपला विदर्भ

**डोंबिवली –** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त डोंबिवलीतील गणेश मंदिरात महाआरतीचे आयोजन करण्यात आले. यावेळी भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, उपमहापौर राहुल दामले यांच्यासह भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभावे, तसेच त्यांच्या हातून देशसेवेचे कार्य अधिक जोमाने घडावे, अशी प्रार्थना यावेळी श्री गणरायाच्या चरणी करण्यात आली. गणेश आरतीनंतर उपस्थितांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छाही दिल्या.

### भटके-विमुक्त हक्क व प्रमाणपत्र अभियानाचे २७ ते २९ सप्टेंबर या कालावधीत आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर** : राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता या अभियानांतर्गत राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या नागरीकांना शासनाच्या विविध योजनांचा व प्रमाणपत्रांचा लाभ मिळण्याकरीता भटके–विमुक्त हक्क व प्रमाणपत्र अभियान हे जिल्ह्यातील सर्व तालुक्यात दिनांक २७ ते २९ सप्टेंबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार असल्याची माहिती इतर मागास बहुजन कल्याणच्या सहायक संचालक सुनिता नेर्लीकर यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.या अभियानामध्ये आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, जात प्रमाणपत्र, आयुष्मान भारत कार्ड, उत्पन्नाचा दाखला, नॉन क्रिमीलेयर, रहिवासअधिवास दाखला, विवाह नोंदणी, दिव्यांग इ. प्रमाणपत्रे, तसेच श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, संजय गांधी निराधार अनुदान योजना, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, प्रधानमंत्री आवास योजना, पीएम किसान योजना इत्यादी योजनांचे प्रत्यक्ष लाभ पालकमंत्री, पालक सचिव व इतर मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना वितरण करण्यात येणार आहे.

# गणेशोत्सव मंडळातच मिळणार आरोग्यसेवेची माहिती

## महसूल योजनांचाही जागर चिखलीच्या निलकमल गणेशोत्सव मंडळात 'लोकसंवाद-२०२६' उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** गणेशोत्सवाच्या उत्सवी वातावरणात नागरिकांशी थेट संवाद साधत शासनाच्या योजना, उपक्रम आणि निर्णयांची माहिती पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने 'लोकसंवाद–२०२६' हा विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत चिखली येथील निलकमल गणेशोत्सव मंडळात आरोग्य तपासणी, आरोग्यविषयक समुपदेशनासह महसूल विभागाच्या विविध योजना व निर्णयांची माहिती नागरिकांना देण्यात




येणार आहे. दि. १९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता निलकमल गणेशोत्सव मंडळ, चिखली, जि. बुलढाणा येथे हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. जिल्हा माहिती कार्यालय, बुलढाणाच्या पुढाकाराने आयोजित या कार्यक्रमात आरोग्य विभागाच्या विविध योजनांची माहिती, नागरिकांची आरोग्य तपासणी आणि आवश्यक आरोग्यविषयक समुपदेशन करण्यात येणार आहे. तसेच महसूल विभागाशी संबंधित शासन आदेश, निर्णय व विविध योजनांची माहितीही नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे.

गणेशोत्सव हा नागरिकांच्या मोठ्या सहभागाचा उत्सव असल्याने या माध्यमातून शासनाच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती थेट नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. 'लोकसंवाद–२०२६'च्या माध्यमातून माहितीपासून लाभापर्यंतचा दुवा अधिक प्रभावी करण्याचा जिल्हा माहिती कार्यालयाचा प्रयत्न आहे.

नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होऊन आरोग्य तपासणी व शासकीय योजनांची माहिती घेण्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

## भरती परीक्षा सुधारणांवर चर्चेसाठी उपस्थित राहण्याचे विभागीय आयुक्तांचे आवाहन, २१ सप्टेंबर रोजी उच्चस्तरीय समिती भेट देणार

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी :** राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह व उमेदवाराभिमुख करण्यासाठी परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्यासाठी गठित उच्चस्तरीय समिती सोमवार, दि. २१ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता छत्रपती संभाजीनगर येथील स्मार्ट सिटी कार्यालयात भेटण्यासाठी उपस्थित राहणार आहेत. या भेटीसाठी विद्यार्थी, परीक्षार्थी व संबंधित घटकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी केले आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी, अभ्यासिका चालक–मालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था तसेच परीक्षा पद्धतीबाबत सूचना मांडू इच्छिणाऱ्या नागरिकांनी भेटसाठी उपस्थित राहून आपले अनुभव व सूचना समितीसमोर मांडाव्यात. यापूर्वी ई–मेलद्वारे सूचना व अभिप्राय सादर केलेल्या विद्यार्थी व संबंधित घटकांनीही बैठकीस प्रत्यक्ष उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

राज्यातील शासकीय भरती परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित व विश्वासार्ह करण्यासाठी आवश्यक सुधारणा, तसेच परीक्षा प्रक्रियेतील अडचणी व त्यावरील उपाययोजनांबाबत याबाबत चर्चा होणार आहे. परीक्षा पद्धतीशी संबंधित विविध घटकांना प्रत्यक्ष चर्चेत सहभागी होऊन आपल्या सूचना मांडण्याची संधी मिळणार आहे. भरती परीक्षा पद्धती अधिक सक्षम करण्यासाठी विद्यार्थी, परीक्षार्थी, क्लास चालक–मालक व संबंधित संस्थांनी या बैठकीत सक्रिय सहभाग नोंदवून आपल्या सूचना मांडाव्यात, असे आवाहन विभागीय आयुक्तांनी केले आहे.

## प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे व उपजिल्हाधिकारी समाधान गायकवाड यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनीही प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

### पंतप्रधानांच्या वाढदिवसानिमित्त नाशिकमध्ये विशेष गोदाआरती; दीर्घायुष्यासाठी प्रार्थना

**नाशिक –** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त नाशिकच्या पवित्र गोदावरी तीरावर विशेष गोदाआरतीचे आयोजन करण्यात आले. भाजपचे नेते डॉ. अपूर्व हिरे यांच्या संकल्पनेतून या गोदाआरतीचे आयोजन करण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना दीर्घायुष्य लाभावे, उत्तम आरोग्य लाभावे आणि देशसेवेचे कार्य निरंतर सुरू राहावे, यासाठी यावेळी प्रार्थना करण्यात आली. मंत्रोच्चार आणि आरतीच्या भक्तिमय वातावरणात हा कार्यक्रम पार पडला.

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते नागपूरच्या नव्या इंदोरा चौक – दिघोरी चौक उड्डाणपुलाचे उद्घाटन

**नागपूर । प्रतिनिधी :**

नागपूरच्या नागरी रस्ते पायाभूत सुविधांमध्ये एक महत्वाची भर घालण्यास, नागपूर शहर सज्ज झाले आहे. शहरातल्या इंदोरा चौक – दिघोरी चौक या राष्ट्रीय महामार्ग ३५३डी वरच्या नव्या उड्डाणपुलाचे उद्धाटन, उद्या म्हणजेच शनिवारी, १९ सप्टेंबर २०२६ ला दुपारी साडे चार वाजता रेशीमबाग चौक, नागपूर इथे होणार आहे.

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि म हामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते या पुलाचे उद्धाटन होईल. यावेळी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, यांच्यासह, शिवेंद्रसिंह भोसले, ॲड. आशीष जयस्वाल, इतर मान्यवर आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने हाती घेतलेला हा प्रकल्प राष्ट्रीय महामार्ग–३५३डी वरील नागपूर–उम रेड या मार्गिकेचा भाग आहे. या मार्गिकेमुळे इंदोरा चौक (ऱ्ह–४४), अशोक चौक, शीतला माता चौक आणि दिघोरी चौक हे प्रमुख मार्ग जोडले जातील.

एकूण ८.९० किलोमीटर लांबीच्या या पूलांममध्ये, ६.३७ लांबीचा उड्डाणपूल असून, ९९७.४४ कोटी रुपये खर्चून हा प्रकल्प पूर्ण करण्यात आला आहे.

प्रकल्पाची प्रमुख वैशिष्ट्ये :

उड्डाणपूलाची रुंदी, १२ म ीटर इतकी असून, दोन्हीकडच्या वाहतुकीची सोय होण्यासाठी, त्यात दोन मार्गिका देण्यात आल्या आहेत. या पूलाच्या बांधकामात, अल्ट्रा–हाय परफॉर्मन्स फायबर–रिइन्फोर्स्ड कॉंक्रीट तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. त्याची कमाल लांबी ९० मीटर आहे. या संरचनेत ६० मीटर लांबीच्या ३४ स्पॅनचा समावेश आहे. भांडे प्लॉट आणि शीतला माता चौक येथे प्रत्येकी ९० मीटर लांबीचे दोन स्पॅन आहेत, तर उर्वरित स्पॅनची लांबी ४५ मीटर आहे.

या प्रकल्पात, दोन आर ओ बी म्हणजे, रेल्वे उड्डाणपूल असून, १३.८२ किमीचे सर्व्हिस आणि स्लिप मार्ग आहेत. पाचपावली इथे सध्या असलेल्या रेल्वे उड्डाणपुलाची जागा नवा पूल घेईल. तर, नाईक तलाव आणि पाचपावली दरम्यानचे रॅम्प तसेच कायम ठेवण्यात आले आहेत. ताजबाग इथे वर आणि खाली जाण्यासाठी, रॅम्प देण्यात आले असून, डागा मेमोरियल विमेन्स हॉस्पिटल च्या तिथे खाली जाणारा रॅम्प देण्यात आला आहे.

अग्रसेन चौक इथे उड्डाणपूल पहिल्या स्तरावर बांधण्यात आला असून, त्यावरून विद्यमान मेट्रो मार्गिका दुसऱ्या स्तरावरून जाते. त्यामुळे दोन्ही संरचना वेगवेगळ्या उंचीच्या स्तरांवर कार्यरत राहतात. अशोक चौक इथे पायलन संरचनेसह उन्नत गोलाकार वाहतूक व्यवस्था (रोटरी) उभारण्यात आली आहे. या रोटरीला भंडारा रोड, मेडिकल चौक आणि नागपूर बसस्थानकाच्या दिशेने जाणाऱ्या रॅम्पद्वारे जोडण्यात आले आहे.

## शिलाई मशीनवर विराजमान झाली गौराई; कष्टकरी हातांना सलाम करणारी आगळीवेगळी स्थापना!

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्हा संपर्क प्रमुख गजानन बोरकर यांच्या घरी यंदाच्या गौराईचे अनोख्या पद्धतीने स्वागत करण्यात आले. पारंपरिक सजावटीपेक्षा वेगळी वाट निवडत शिलाई मशीनवर गौराईची स्थापना करण्यात आली. या माध्यमातून कष्ट, श्रम, मेहनत आणि स्वावलंबनाला अनोखा सन्मान देण्यात आला.

शिलाई मशीनच आमचं देऊळ आणि गौराई आमची गृहलक्ष्मी,'' या भावनेतून करण्यात आलेली ही सजावट उपस्थितांचे लक्ष वेधून घेत आहे. घरातील कष्टकरी हातांना आणि स्वावलंबी जीवनशैलीला गौराईच्या रूपाने श्रद्धेची जोड देण्याचा सुंदर संदेश या स्थापनेतून देण्यात आला.



धाग्याची साथ, शिलाई मशीनचा आवाज आणि गौराईच्या आशीर्वादाने घरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. मेहनतीला प्रतिष्ठा आणि कष्टाला संस्काराची जोड देणारी बोरकर यांच्या घरची ही आगळीवेगळी गौराई यंदाच्या उत्सवाचे विशेष आकर्षण ठरत आहे.

# बुलढाण्यात महानायीकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारं अनोखं 'वैचारिक' गौरी पूजन..

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा । प्रतिनिधी :** सावित्रीबाई, अहिल्याबाई, राष्ट्रमाता जिजाऊ, माता रमाई व ताराबाई शिंदे यांच्या प्रतिमांचे पूजन...ठाकरेंच्या शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या जयश्री शेळके यांच्या निवासस्थानी अनेक वर्षापासून राबवला जातो अनोखा उपक्रम...

बुलढाणा पारंपरिक रूढी परंपरेला फाटा देत समाजसुधारक महिलांच्या विचारांचा वारसा पुढे नेणारा 'वैचारिक गौरी पूजन' उत्सव शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या राज्य प्रवक्त्या असलेल्या जयश्री शेळके यांच्या निवासस्थानी साजरा होतोय.



परंपरेनुसार केल्या जाणारे गौरी पूजन न करता ज्या महानायिकांनी आपापल्या कालखंडामध्ये वैचारिक क्रांती घडवली अशा राजमाता जिजाऊ, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, माता रमाई आणि ताराबाई शिंदे यांच्या प्रतिमांचे पूजन करून अनोखा आदर्श घालून देण्यात आला आहे..




या सोबतच, प्रबोधनात्मक पुस्तके ही ठेवण्यात आली आहेत.. महिलांच्या सबलीकरणासाठी आणि अनिष्ट प्रथांच्या निर्मूलनासाठी वैचारिक क्रांती घडवणाऱ्या या महानायिकांचे विचार घरोघरी पोहोचवणे, आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हा मुख्य उद्देश असल्याचे जयश्री शेळके यांनी सांगितले.